सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डब्ल्युइबी-१०२०/सी.आर.२६/२०२१/मा.तं. दिनांक: २४ मार्च, २०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय:-** महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२३ लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेच्या सवलतीबाबत.

**संदर्भ:-** आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२३ च्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या वेबलिंकद्वारे दिनांक १९ मार्च, २०२३ पर्यंत अपलोड करण्याबाबत संदर्भिय दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले होते. तथापि, प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्जाद्वारे लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेचा दावा केलेल्या काही उमेदवारांनी उपरोक्त वेबलिंकद्वारे विनंती अर्ज/कागदपत्रे सादर केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेकरीता ऑनलाईन अर्जाद्वारे लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेचा दावा केलेल्या परंतू उपरोक्त वेबलिंकद्वारे विनंती अर्ज/कागदपत्रे सादर न केलेल्या उमेदवारांना सदर कार्यवाही पूर्ण करण्याकरीता पुन्हा संधी देण्यात येत असून अशा उमेदवारांनी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या सदराखालील 'Upload Documents' मध्ये उपलब्ध वेबलिंकद्वारे विनंती अर्ज/कागदपत्रे **दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९ पर्यंत** अपलोड करणे आवश्यक आहे.

**३.** उपरोक्त वेबलिंकद्वारे विहित मुदतीमध्ये विनंती अर्ज/कागदपत्रे सादर न करणा-या उमेदवारांना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग